23 फेब्रुवारी, 2004

*किरीट सोमैया यांनी पत्रकार परिषदेत केलेले निवेदन*

# कुर्ला विधानसभेत मोठया संख्येत बोगस नांवे

-- किरीट सोमैया

सबंध मुंबईत मोठया प्रमाणात मतदार कमी झाल्याचे महाराष्ट्राचे मुख्य निवडणुक आयुक्त श्री. भार्गव यांनी आता कबूल केले असल्याची माहिती श्री.सोमैया यांनी दिली. फक्त कुर्ला हे एक असे विधानसभा क्षेत्र आहे की जेथे 2001 च्या घरोघरी मतदार नोंदणीच्या वेळी 4,886 मतदार वाढले असल्याचे आढळले. तर ईशान्य मुंबईच्या अन्य पाचही विधानसभा क्षेत्रात मिळून 2001–02 मध्ये 1लाख 3 हजार मतदार कमी झाले आहेत.

20 फेब्रुवारी 2004 रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित झाल्या नंतर कुर्ला विधानसभेत आता एकंदर 1999च्या 4,25,610 मतदारांसमोर 4,43,473 मतदार दिसत आहेत.

श्री. सोमैया यांनी मुख्य निवडणुक आयुक्त श्री.कृष्णमुर्ती यांच्याकडे 20 दिवसांपूर्वी केलेल्या तक्रारी नंतर कुर्ला विधानसभेतील मतदार यादीतुन 11,082 मतदारांची नांवे बोगस/ डयुप्लिकेट सांपडली असल्यामुळे आता ती रद्दबादल करण्यांत आली असल्याचे श्री.सोमैया यांनी सांगितले.

कुर्ला मतदार क्षेत्रातील पुरवणी यादी प्रसिध्द करण्यापूर्वी पुन्हा एकदा घरोघरी जावून प्रत्यक्ष पाहणी करण्यांत यावी अशी मागणी श्री.सोमैया यांनी केली आहे.

अजुनही कुर्ला मतदार क्षेत्रात राहत नसलेली स्थलांतरीत झालेली, डयुप्लिकेट, बोगस नांवे मोठया प्रमाणात असल्याचा आरोप श्री.सोमैया यांनी केला आहे. जोगेश्वरी–विक्रोळी लिंक रोडवरील मिलिंद नगर येथील शेकडो परिवार स्थलांतरीत झाल्या नंतरही त्यांची नांवे जाणुनबुजून मतदार यादीत कायम ठेवण्यांत आली असल्याचे श्री.सोमैया यांनी सांगितले. याचा पुरावाही त्यांनी यापूर्वी मुंबईत एका पत्रकार परिषदेत रुजु केला होता.

कुर्ला विधानसभा क्षेत्रात येणा–या बुथ क्र.111मधील उत्तरांचल प्रदेशातील लोकांची असलेली हिमालया सोसायटी या इमारतीत राहणा–या मतदारांची नांवेच गायब आहेत. पण या इमारतीत न राहणा–या 22 बोगस मतदारांची नांवे या इमारतीत राहतात म्हणून दर्शविण्यांत आली आहेत. याचा पुरावा त्यांनी निवडणुक आयोगाकडे पाठविण्यांत आला आहे.

---